# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 November 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – १६ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भाजप बूथ कार्यकर्त्यांशी संवाद
- केंद्र सरकारने आरक्षण ५० टक्क्यांच्या वर न्यावं तसंच जातीनिहाय जनगणना करावी–शिर्डीच्या प्रचार सभेतून प्रियांका गांधी यांचं आव्हान
- मतदार जनजागृतीसाठी स्वीप उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचं आयोजन

आणि

- यंदाचा अनंत भालेराव पुरस्कार निवृत्त पोलिस अधिकारी डॉ. मीरा बोरवणकर यांना जाहीर

****

राज्य विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नमो ॲपच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद साधला. ‘मेरा बूथ सबसे मजबूत’ या संकल्पनेतून साधलेल्या या संवादात, पंतप्रधानांनी महायुतीच्या कामाबद्दल जनता समाधानी असल्याचा विश्वास व्यक्त केला. भाजपा सुरुवातीपासून मध्यमवर्गाच्या आकांक्षांवर लक्ष केंद्रीत करत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत मध्यमवर्गाचं योगदान सगळ्यात जास्त असल्याचं लक्षात घेऊन, त्यांच्यावरचा कराचा बोजा कमी केल्याचं पंतप्रधानांनी स्पष्ट केलं.

****

केंद्र सरकारने आरक्षणाचं प्रमाण ५० टक्क्यांच्या वर न्यावं, आणि जातीनिहाय जनगणना करावी असं आव्हान काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनी दिलं आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी मतदारसंघातील साकुरी इथल्या प्रचार सभेत त्या

आज बोलत होत्या. दुसऱ्या राज्यात जाणारे उद्योग आणि बेरोजगारी या मुद्यावरून त्यांनी सरकारवर टीका केली.

****

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास सोयाबीनला सात हजार रुपये हमीभाव तसंच कांद्याला विशेष समिती नेमून योग्य भाव देण्यासाठी आपण कटिबद्ध राहू असं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिलं आहे. ते आज अमरावती जिल्ह्यात धामणगाव रेल्वे इथं प्रचारसभेत बोलत होते. देशाच्या विकासात काँग्रेसनं अमूल्य योगदान दिलं असून काँग्रेस नेहमीच शेवटच्या घटकाचा सर्वात आधी विचार करते असं राहुल गांधी म्हणाले.

****

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती चिंताजनक असल्याचं मत काँग्रेस नेते आणि माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी व्यक्त केलं आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

दरम्यान, सांगली विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराविरोधात बंडखोरी करणाऱ्या जयश्री पाटील यांना काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलं आहे. प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली.

****

येत्या ५ वर्षात मुंबईकरांचा रेल्वे प्रवासाचा अनुभव मोठ्या प्रमाणात सुखद होईल, असं आश्वासन रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते.

मनोरंजन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळ यावं यासाठी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटीव्ह टेक्नॉलॉजी ची स्थापना करायला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. यातली पाहिली संस्था मुंबईत सुरू होणार असल्याची घोषणा वैष्णव यांनी केली.

****

शिवसेनेचे मुख्य नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यात दापोली मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार योगेश रामदास कदम तसंच गुहागर मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार राजेश बेंडल यांच्या प्रचारासाठी यांच्या

प्रचारासाठी सभा घेतल्या. राज्यात महायुतीला १७० जागा मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

****

महाराष्ट्रात राजकीय स्थिरतेसाठी तसंच विकास आणि सुरक्षिततेसाठी महायुती हाच पर्याय आहे. असं मत भारतीय जनता पक्षाचे नेते सत्यपाल सिंह यांनी व्यक्त केलं. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. कायदा आणि सुरक्षितेच्या दृष्टीने महाराष्ट्र हे चांगलं राज्य असल्यानं इथं गुंतवणूकही वाढत आहे असं सिंह यांनी सांगितलं.

****

विधानसभेत हमी भावाचा कायदा व्हावा, यासाठी आपण आग्रही असल्याचं वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे. अकोला जिल्हयातल्या कुरणखेड इथल्या प्रचारसभेत ते आज बोलत होते. दरम्यान, आज सायंकाळी छत्रपती संभाजीनगर इथं आंबेडकर यांची प्रचारसभा होणार आहे.

****

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांची उद्या, रविवारी पुण्यातील येरवडा परिसरात सभा होणार आहे. दुपारी १२ वाजता ही महासभा आयोजित करण्यात आली असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

प्रचाराचा अवधी संपत असल्याने, उमेदवारांनी प्रचाराला वेग दिला आहे. घरोघरी जाऊन प्रचारावर अधिक भर असल्याचं पहायला मिळत आहे.

जालना जिल्ह्यात महायुतीचे भोकरदनचे उमेदवार संतोष दानवे यांनी आज ग्रामीण भागात प्रचार फेरीच्या माध्यमातून मतदारांशी संवाद साधला.

छत्रपती संभाजीनगर इथे आज ऑल इंडिया मजलिस- ए- इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे नेते माजेद हुसेन सहाब यांची पक्षाच्या उमेदवारांसाठी रोशन गेट येथे सभा होणार आहे. महाविकास आघाडीचे नेते अंबादास दानवे यांनी आज पैठण मतदार संघातील पक्षाचे उमेदवार दत्ता गोर्डे यांच्या प्रचारार्थ पैठण तालुक्यातील चिंतेपिंपळगाव येथे सभा घेतली. औरंगाबाद पश्चिम विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार संजय शिरसाट यांनी मतदार संघात जनतेशी संवाद साधला.

****

विधानसभा निवडणुकीत राज्यात मतदानाचं प्रमाण वाढावं यासाठी राज्यात अनेक ठिकाणी विशेष संकल्पना घेऊन मतदान केंद्र उभारली जात आहेत. यात जैवविविधता, सांस्कृतिक-सामाजिक वारशांचं दर्शन, स्तन्यदा-गर्भवती महिलांसाठी हिरकणी मतदान केंद्र, युवा, दिव्यांग तसंच महिला संचलित विशेष मतदान केंद्र उभारली जात आहेत. दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, पिण्याचं पाणी तसंच स्वच्छतागृहांची सोय देखील उपलब्ध असणार आहे.

****

स्वीप कार्यक्रमाअंतर्गत राज्यभर मतदार जनजागृतीपर उपक्रम राबवले जात आहेत. लातूर जिल्ह्यात अभंग, गवळणी, भारुड, गोंधळगीत, पोवाडा अशा पारंपरिक कलाप्रकारांचा अभिनव वापर केला जात आहे. जिल्ह्यात १२१ शाळांमधल्या विद्यार्थ्यांमार्फत १ लाख ३ हजारांपेक्षा जास्त पालकांपर्यंत पोहोचत मतदानाचं संकल्पपत्र भरून घेण्यात आलं.

तुळजापूर इथं ३७ शाळेतील ३७०० विद्यार्थी तसंच ३२१ शिक्षकासह जनजागृती फेरी काढण्यात आली. हातात घोषवाक्याचे फलक घेऊन शहरातील विविध भागातून या फेरीनं जनजागृती केली.

****

येत्या निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन सर्व मतदारांना करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर इथली एमबीएची विद्यार्थिनी असलेल्या साक्षी वैद्य या नवमतदार तरुणीनेही सर्वांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

बाईट – साक्षी वैद्य

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज कोल्हापूर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

निवृत्त पोलिस अधिकारी डॉ. मीरा चड्डा -बोरवणकर यांना यंदाचा अनंत भालेराव स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. अनंत भालेराव प्रतिष्ठानचे संजीव कुलकर्णी आणि हेमंत मिरखेलकर यांनी नांदेड इथं ही माहिती दिली. मानपत्र, स्मृतिचिन्ह

आणि पन्नास हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या ८ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा साहित्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणाऱ्या विशेष कार्यक्रमात डॉ. मीरा बोरवणकर यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

****

राज्याचे टपाली मतपत्रिका राज्यसमन्वय केंद्र छत्रपती संभाजीनगर इथं उभारण्यात आलं आहे. सर्व २८८ विधानसभा मतदार संघातल्या टपाली मतपत्रिकांचं संकलन तसंच वितरण या केंद्रातून केलं जात आहे. मतदान झालेल्या सुमारे २२ हजारांहून अधिक तसंच कोऱ्या मतपत्रिकांचं हस्तांतरण या ठिकाणी सुरु असल्याची माहिती, नोडल अधिकारी प्रभोदय मुळे यांनी दिली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज या केंद्राला भेट देऊन कामाची पाहणी केली.

****

जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदार संघामध्ये एक हजार ७५५ मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदारांना ने-आण करण्यासाठी व्हीलचेअर पुरवण्यात आलेल्या असून सर्वच केंद्रावर दिव्यांग मतदारांना मदत करण्यासाठी विशेष दोन स्वयंसेवक नेमण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी ही माहिती दिली.

****

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने १९ आणि २० नोव्हेंबर रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या राजकीय जाहिरातींचं पूर्व प्रमाणीकरण बंधनकारक असल्याचं बीडच्या जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीकडून सांगण्यात आलं आहे. यासोबतच दूरचित्रवाणी वाहिन्या, दृक-श्राव्य जाहिरातींचे देखील पूर्व प्रमाणीकरण करणं आवश्यक आहे.

दरम्यान, राजकीय जाहिरातीच्या पूर्व प्रमाणिकरणाची मुदत उद्या संपत असल्याचं नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सांगितलं आहे. सोशल मीडिया तसंच यू-ट्यूबर्सना मतदानापूर्वी शेवटच्या ४८ तासात प्रचार प्रसारास बंदी असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

परभणी जिल्ह्यातल्या पाथरी मतदारसंघात एकूण ५३१ मतदारांचं गृहमतदान घेण्यात आलं. यामध्ये ४८५ वयोवृद्ध आणि ४६ दिव्यांगांचा समावेश आहे. ५७६ मतदारांनी गृहमतदानासाठी अर्ज केले होते. अर्जांनुसार गेले दोन दिवस मतदान करण्याची सुविधा प्रशासनाकडून देण्यात आली होती.

****

नांदेड शहरात आज मतदान जनजागृतीसाठी दुचाकी फेरी काढण्यात आली. या जनजागृती फेरीत महापालिकेतील सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

****

भूखंड घोटाळा प्रकरणात मुंबईतल्या उत्तर पश्चिम मतदारसंघातले खासदार रवींद्र वायकर यांना जोगेश्वरी भूखंड घोटाळा प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे.

****